पर्यावरण विभाग
जा.क्र./पर्या/कार्या:१/३२/२०१९
दि. ०४/०४/२०१९
प.९६३

# नाशिक महानगरपालिका,नाशिक

मा. मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल जनहित याचिका क्र. १७६/२०१२ मधील निर्देशानुसार तसेच मा.विभागीय आयुक्त,नाशिक यांचे पत्र क्र.कक्ष-१५/क.शु-२/२०२/२०१९, दि. २०/२/२०१९ अन्वये स्थापन्न केलेल्या नाशिक महानगरपालिका स्तरावरील उपसमितीच्या दि. २८/3/२०१९ रोजीच्या प्रथम बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक २८/3/२०१९ रोजी मा.आयुक्त सो. यांचे दालनात मा.उच्च न्यायालयात दाखल गोदावरी प्रदुषण जनहित याचिका क्र. १७६/२०१२ मधील मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी आजपावेतो जे जे आदेश दिलेले आहेत त्या मुद्यांचा, व नव्याने दि. १८/१२/२०१८ रोजी दिलेल्या निर्देशा बाबतचा, तसेच निरीने दिलेल्या शिफारशींचा, तसेच गोदावरी प्रदुषण नियंत्रणाबाबत चर्चा करणेसाठी नाशिक मनपा स्तरावरील उपसमितीची बैठक आयोजीत केली होती.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे मान्यवर उपस्थित होते.

१) आयुक्त, नाशिक महानगरपालिका
२) अधीक्षक अभियंता, सा.आ.अ.वि.(मलनि)
३) अधीक्षक अभियंता, (यांत्रिकी)
४) कार्यकारी अभियंता,(पर्यावरण)
५) निरीचे प्रतिनिधी
६) पोलिस उपआयुक्त,नाशिक यांचे प्रतिनिधी
७) सहा.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
८) माहिती उपसंचालक, नाशिक यांचे प्रतिनिधी
९) जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांचे प्रतिनिधी

सदर बैठकीत प्रथमतः मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांवर तसेच निरीने सुचविलेल्या शिफारशींबाबत नाशिक महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीचे सादरीकरण कार्यकारी अभियंता (पर्यावरण) यांनी केले.

सदर बैठकीत सादरीकरणानंतर काही सुचना उपस्थित करण्यात आल्या.

१) मुद्दा क्र. १५ बाबत मनपाने टोल फ्रि क्र. १८००२३३७९८२ उपलब्ध असून त्यावर आलेलया तक्रारींबाबत त्या त्या विभागामार्फत कार्यवाही करण्यात येते.
२) मुद्दा क्र. १६ बाबत संकेत स्थळावर आवश्यक ती माहीती प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
३) मुद्दा क्र. १९ ते २२ बाबत जनजागृती आराखडा तयार करण्यात येत असून तो आवश्यक मंजुरी प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
४) नाशिक शहरातील गणपती विसर्जनात संकलीत करण्यात आलेल्या गणेश मुर्ती या कृत्रिम तळे करून त्यात विसर्जीत करण्यात येतात, तसेच नागरिकांना अमोनियम बायकार्बोनेट उपलब्ध करून देण्यात येते, जेणेकरून नागरिक स्वतः घरच्या घरी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मुर्ती विसर्जीत करु शकतील.

५) STP मधुन जे प्रकिया युक्त सांडपाणी बाहेर येते त्यावर पांढऱ्या रंगाचा फेस मोठया प्रमाणात असतो याबाबतचा विषय चर्चेला आला असता त्यावर येणारा फेस हा मोठया प्रमाणात डिटर्जंट पावडरचा वापर होत असल्याने तयार होतो असे सांगण्यात आले. सदर फेसाचे प्रमाण बऱ्याच अंशी कमी (जवळ जवळ निम्याने) झाल्याबाबत मनपाच्या वतीने सांगण्यात आले, व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सहा.प्रादेशिक अधिकारी श्री.करे यांनी मान्य केले.

६) तपोवन व आगरटाकळी STPचे upgradation चा DPR निरीला सादर केल्यानंतर, त्यावर निरी त्यांच्या शिफारशी सुचवतील. तसेच निरीकडुन सुचविण्यात आले की सदर STP ची सिस्टीम पुर्ण बदलल्यास खर्चाचे प्रमाण वाढणार आहे, व टर्शरी ट्रिटमेंट केल्यास BOD कमी होण्यास मदत होईल.

७) नंदिनी नदीपात्रात नाशिक शहरातील हॉस्पिटल्सचे बेडशिटस, व इतर कपडे धुतले जातात, त्यास मज्जाव करणेत यावा.

८) रामकुंडावर बाहेरुन भाविक येत असतात, त्यांना नदीपात्रात निर्माल्य, केरकचरा,पिंडदानाचे विधी टाकण्यापासुन मज्जाव करावा, तसेच त्याबाबत भाविकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक राहिल, असे सुचविणेत आले. त्यावर सांगण्यात आले की, भाविकांना नदीमध्ये निर्माल्य अथवा इतर वस्तु टाकणेस प्रतिबंध करणेसाठी निर्माल्य कलश ठेवणेत आले आहेत तसेच माहिती व जनजागृतीसाठी मोठमोठे होर्डिंग्स लावणेत आले आहेत. तसेच नदीमध्ये कचरा, निर्माल्य,प्लास्टीक पिश्व्या टाकणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक स्वरुपाची कार्यवाही करणेत येते. दंडात्मक कारवाईतुन आतापावेतो नाशिक मनपाने सुमारे एक ते दिड लाख रुपये वसुल केले आहेत असे पंचवटी विभागीय स्वच्छता निरीक्षक यांनी सांगितले. तसेच रामकुंडावर पोलिस विभागाने मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार ३० पोलिस कॉन्स्टेबल, व ४ पी.आय. यांची नेमणुक केल्यास नागरिकांवर प्रदुषणाबाबत वचक निर्माण होईल.

९) नदीची स्वच्छता करण्याची मोहिम राबविणेसाठी शहरातील NGO यांची मदतीची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत NGO यांचे मार्फत महिन्यातून १/२ वेळेस स्वच्छता मोहीम घेणेत येते, सदर मोहीम ही होळकर पुलापासुन ते टाळकुटेशवर पुलापावेतो राबविणेत येते. तसेच कार्यकारी अभियंता (पर्यावरण) यांनी सुचीत केले की, पुढच्या बैठकीचे वेळेस निरी, माहिती उपसंचालक, जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांनी आपल्या सुचना द्याव्यात, जेणेकरून त्याप्रमाणे सुधारणा करणे शक्य होईल.

याप्रमाणे सदर बैठकीत चर्चा करणेत येऊन बैठक विसर्जीत करण्यात आली.

आयुक्त

नाशिक महानगरपालिका,नाशिक